Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal

ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 8 | Feb - 2016




# यशवंतराव आणि ऋणानुबंध

सिंधु नामदेवराव राठोड

प्राध्यापक, श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय, जालना.

## प्रस्तावना

भारताचे माजी उपपंतप्रधान, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आदरणीय स्व.यशवंतराव चव्हाण ही केवळ ' एक व्यक्ती नसुन तो एक विचार होता....जसा तो एक विचार होता तसा तो एक आचार होता....' एक कर्तव्यदक्ष प्रशासक,चतुर आणि मुत्सद्दी राजकारणी,साहित्यप्रेमी,थोर ज्ञानपिपासु,एक रसिक नेता आणि एक कनवाळू माणुस अशा कितीतरी पैलुंनी यशवंतरावांचे दर्शन महाराष्ट्राला आणि देशाला घडले आहे.एक साहित्यप्रेमी या अर्थाने विचार करता ते म्हणतात की,शब्दांच्या सामर्थ्यावर आणि सौंदर्यावर माझा नितांत विश्वास आहे.शब्द विचार देतात.बंदुकीच्या गोळीतुन जे प्राप्त होत नाही ते शब्दातून येते.साम्राज्यशाही धुळीला मिळविण्याचे संहारक सामर्थ्य शब्दात आहे.तसेच कल्पना,विचार आणि शब्द ...यांचा त्रिवेणी संगम ही मानवी इतिहासातील जबरदस्त शक्ती आहे.साहित्याचे प्रमुख शब्दच आहे आणि राजकारणाचे प्रमुख माध्यम शब्दच आहे."म्हणुन शब्दास विशेष महत्त्व ते देतात.




यशवंतरावांनी विपुल प्रमाणात साहित्य निर्माण केले असले तरी ' ऋणानुबंध ' या पुस्तकाचा विचार करता यात यशवंतरावांनी वेळोवेळी लिहीलेली लेख आणि केलेली भाषणे संग्रहित करण्यात आलेली आहे. ' भाषणे आणि लेख ' एकाच पुस्तकात लिहीण्यामागची भुमिका स्पष्ट करत असताना ते सांगतात की," ललित लेखनाचा आत्मा केवळ शब्द लालित्यात नाही.विचारांच्या पार्श्वभूमीवर भावविश्वात न्हाऊन निघालेली जिवंत अनुभूती व्यक्त होताना ललित रुपच घेते.मग ही अनुभूती कोणत्याही क्षेत्रातील का असेना !या माझ्या विचारांच्या आधारावर काही राष्ट्रपुरुष,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मराठी माणसे,त्याचप्रमाणे साहित्यक्षेत्रातील प्रथित यश साहित्यकांसंबधीच्या माझ्या भावना आणि विचार ज्या लेखांत किंवा भाषणात व्यक्त झालेले आहेत ते सर्व लेख या पुस्तकात सामावले आहेत."ऋणानुबंधातील सर्व लेख हे यशवंतरावांच्या या भुमिकेशी सुसंगत अशा स्वरुपाच्या आहेत.ऋणानुबंधातून आपल्या समोर उभे केले आहे.

'काही छंद : काही श्रध्दा 'या लेखातून आपले जीवनविषयक तत्वज्ञान सांगतांना ते म्हणतात की,"राजकारण हेच संपुर्ण जीवन आहेअसे मी मानले नाही.आजही मानत नाही,राजकारण विसरुन इतर प्रकारच्या जीवनात संपर्क साधावा ,विचार करावा,असाही प्रयत्न मी केला आहे.केवळ राजकारणवादी जीवन असे काही असु शकत नाही.ज्यामध्ये रस घ्यावा आणि चैतन्याची प्राप्ती करुन घ्यावी,अशी जीवनाची अनेक क्षेत्रे आहे.कला आहे,साहित्या आहे,संगीत आहे,विविध खेळ

आहे,नाटय आहे अशी पुष्कळ क्षेत्रे आहेत." आणि ख-या अर्थाने यशवंतरावांनी आपल्या संपुर्ण जीवनकार्यात या जीवनाच्या सर्व क्षेत्राचा पुरेपुर आनंद घेतलेला आहे.

'सरकारचे नेतृत्व म्हणजे समाजाचे नेतृत्व ,असे मानणे अपूरे आणि अशास्त्रीय होईल 'या संपुर्ण लेखातून त्यांनी स्वत:चे आत्मचिंतन केले आहे.राजकारणासारखे जटील क्षेत्रातही ते किती आणि कसे प्रगल्भ चिंतन करु शकतो हे या लेखातून जाणवते.महात्मा गांधी व पंडीत नेहरु यांच्याविषयीची प्रगाढ श्रध्दा आणि अलिप्तपणे स्वत:कडे पाहुन स्वत:च्या यशापशाचे,वृत्ती प्रवृत्तीचे चित्रण त्यांनी अत्यंत प्रभावीपणे केले आहे.तसेच 'आशा निराशेचे क्षण 'या लेखामध्ये महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या वेळी जी उद्दिष्टये डोळ्यासमोर होती ती पूर्णपणे प्रत्यक्षात उतरली नसल्याची खंत ते या लेखातून व्यक्त करतात.१९७७ साली परराष्ट्र मंत्री म्हणून इंदिरा गांधींनी आणीबाणी उठवून निवडणुका जाहीर केल्याचा संदेश जेव्हा त्यांना मिळाला तेव्हा उत्स्फुर्तपणे त्यांची जी प्रतिक्रिया प्रगट झाली ती त्यांच्या उदारमतवादी लोकशाहीप्रेमी,स्वातंत्र्यप्रेमीवृत्तीचे दर्शन घडविणारी होती.त्यावेळी वेणुताईंना ते लिहीतात की," बहुतेक सर्व राजबंदी सुटतील व निवडणुकीचे वातावरण प्रस्थापित होईल.

धिस इज अगेन.हवा मोकळी होईल.आज मी आनंदात आहे.यातून आणीबाणीसंबंधीची त्यांची नाराजी प्रकट करणारी आहे,असे दिसते.

'स्वातंत्र्याचा पहिला दिवस 'आणि 'संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे क्षण 'या दोन्ही लेखातून स्वातंत्र्य प्राप्तीने उल्हासित आणि उत्साहित असे जनमानस व त्यांचे आनंदोत्फुल्ल वर्तन यांचे जिवंत चित्रण आलेले आहे.वातावरण व प्रसंगाचे सहजसुंदर वर्णन एक स्थुत्य ललित गद्याचा नमुना वाटावा असे आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी पडद्यामागील घडलेल्या घटना माहीती म्हणून हा लेख वाचणीय झालेला आहे.

'केल्याने देशाटन 'या लेखात त्यांच्या विविध देशातून घडून आलेला प्रवास  नमुद करतात.तसेच त्या त्या देशाचे लोकजीवन,इतिहास,परंपरा,संस्कृती,राजकारण यांचे हे वर्णन करतात.विशेष म्हणजे त्या त्या देशातील लेखकाच्या साहित्याविषयी त्यांना आलेले विविध अनुभव ही ते या लेखातून सांगतात.

ऋणानुबंधामधून काही व्यक्तीचित्रणपर लेखही आहेत.' सोनहिरा 'या लेखात आपल्या आईविषयी ते लिहीतात.हे लेख मराठी साहित्यातील सर्वोत्कृष्ट व्यक्तीचित्रण लेखापैकी एक आहे असे म्हणता येईल.आई विठाईनी एकटेपणाने प्रतिकुल परिस्थितीतही मुलांचे केलेले संगोपन,त्यांच्या स्वाभिमान व निर्धार तसेच संकटप्रसंगी स्वत: न डगमगता मुलानींही बाणेदारपणे वागावे असे सांगणारी धीरोदात्त वृत्ती आणि यशवंतरावांचे उत्कट मातृप्रेम या सर्वाचे मनाला स्पर्शुन जाणारे चित्र त्यांनी या लेखातून साकार केले आहे. याशिवाय वेणुताई , म. गाँधी, प. नेहरु, लालबहाद्दुरशास्त्री, डॉ. राधाकृष्णन. काकासाहेब गाडगीळ यांची व्यक्तीचित्रे ही त्यांच्या वैयक्तिक अनुभवाच्या संदर्भामुळे वाचणीय ठरल्या आहेत.' उदारमतवादी केळकर'यांच्याविषयाच्या लेखात त्यांच्या राजकारणातील स्थान कोणकोणत्या कारणांसाठी महत्त्वाचे आहे याचे चित्रण यशवंतरावांनी केलेले आहे.केळकरांच्या 'मध्यमार्गी' यशवंतरावांनी केलेले विवेचन ते यशवंतरावांच्या मुल्यविवेकाचे दर्शन घडविणारे आहे.या लेखातून जणु यशवंतराव 'केळकरांना स्वधर्मी 'मानत असावे असे वाटते.

'ऋणानुबंध 'मधील काही लेखातून यशवंतरावांची साहित्याविषयक भूमिका दिसून येते.त्यांच्या साहित्यातून 'जीवनवादी दृष्टीकोन ' दिसुन येतो.'साहित्य आणि प्रबोधन ','चरित्रे आणि आत्मचरित्रे ','आवडनिवड'प्रकाशनाचा लेखक हे आणि खाडीलकर व माडखोलकर यांच्याविषयक लेखातुन यशवंतरावांच्या चिकीत्सक आणि आस्वादक साहित्य समिक्षेचे दर्शन आपणास घडुन येते.ललित लेखनाविषयी ते म्हणतात की,ललित लेखनाचा आत्मा केवळ शब्द लालित्यात नाही.विचारांच्या पार्श्वभूमीवर भावविश्वात न्हाऊन निघालेली जिवंत अनुभूती ललितरुप घेते.मग ही अनुभूती कोणत्याही क्षेत्रातली का असेना! यशवंतराव स्वानुभूतीला व सामाजिक आशयालाही तेव्हढेच महत्त्व देतात. ते म्हणतात,सामाजिक आशय असल्याशिवाय वाङ्मय परिणामकारक होत नाही.चिरस्थायी होत नाही व अक्षय्य ही होत नाहीअसे ते खांडेकरांच्या सत्कारप्रसंगी म्हणतात.'विचारप्रेरक दृष्टिकोन आणि सामाजिक आशय 'असणा-या खांडेकरांनी जीवनाभिमुख कलेस महत्व देतात.म्हणुन यशवंतरावांना ते थोर वाटतात.साहित्याला भविष्यवेधी दृष्टी असली पाहिजे असेही त्यांना वाटते.आणि ज्यांच्याकडे असा भविष्याकडे वेधी घेणारी दृष्टी नाही त्याला ललित लेखक कसे म्हणावयाचे ?असा प्रश्न ते विचारतात.मध्यमवर्गीय जीवन चित्रण रंगविणारे खांडेकर मराठी मनाचे प्रतिक ठरतात. खांडिलकर किंवा त्यांच्या

काळातील नाटककारांचा विचार करता समाजदर्शन घडविले आहे.ते अत्यंत ढोबळ आहे.'मानापमान' सारखी काल्पनिक संघर्ष रंगवणारी नाटके चिकित्सक मनाची पकड घेतील असे सांगता येत नाही.असे मतही यशवंतराव प्रकट करतात.तरीपण 'मराठीतील संगीत रंगभूमीचा हा वारसा टिकला पाहिजे' असे मत ते व्यक्त करतात.

यशवंतरावांचा चरित्र आणि आत्मचरित्र हा लेख म्हणजे एक अप्रतिम समिक्षणात्मक लेखनाचा नमुना ठरावा असा आहे.आचार्य अत्रे,ना.सी.फडके,काकासाहेब गाडगीळ ,मौलाना आझाद,राजेंद्रप्रसाद या समकालीन व्यक्तीची आत्मचरित्रे त्यांनी वाचली आहेत.व त्याविषयी आपली मते त्यांनी या लेखात मांडली आहे.रसेलचे टोकाचे प्रामाणिकपणा त्यांना भावला तर काकासाहेब गाडगीळ विषयी ते म्हणतात की,आपले आत्मचरित्र थोडे अधिक साफसुफ करण्याची संधी त्यांना मिळायला हवी होती.तसेच ' क-हेचे पाणी ' पेक्षा आचार्या अत्र्यांचे 'मी कसा झालो ?'हे आत्मचरित्र अधिक आवडले.तसेच यासर्व आत्मचरित्राच विचार करता असे म्हणता येईल की,'अलिकडचे आत्मचरित्राचे प्रकार आपले बालपण व तरुणपण याबाबत अतिशय पारदर्शक ,प्रामाणिक असतात.पण अलिकडच्या चालु काळाबाबत मात्र ती अतिशया सावध असतात.'तसेच 'कलाकारांचे आत्मचरित्रे ही अंतर्मुख व राजकीय,सामाजिक कार्याकर्त्यांची आत्मचरित्रे ही बहिर्मुख असतात.म्हणुन कार्यकर्त्यांची आत्मचरित्रातून मोठ्या प्रमाणात माहिती मिळते तर कलावंताची आत्मचरित्रे ही चटका लावणारी ठरतात.हे यशवंतरावांचे मत एका समिक्षणात्मक दृष्टी ठेवणा-या लेखकाचे वाटते.

दलित साहित्यिकांनी मराठी साहित्य क्षेत्रात मोलाची भूमिका पार पाडली आहे.याविषयी ते म्हणतात की,"उच्च भ्रू साहित्यात पाश्चात्य वळणाची अश्लीलता आपणाला चालते. दलितसमाजाकडुन येणा-या साहित्यिकांच्या भाषेस मात्र आपण नाक मुरडतो.हा नैतिक भेदभाव आहे.दुहेरी मानदंडाची भावना त्यांमागे आहे."यातून दलित साहित्याची बाजू ते मांडतात असे दिसते.तसेच दलित साहित्यातूनही जीवनानुभवच प्रगट होताना त्यांच्या साहित्यातून ही जीवनानुभवच प्रगट होतांना त्यांच्या साहित्यास कमी का लेखवावे असेही त्यांना वाटते.'भारतीयता,विश्वात्मकता व मराठीपण हे तिन्ही गुण मराठी साहित्यात एकाच वेळी नांदले ,तर ते साहित्य समृध्द होईल."असेही ते व्यक्त करतात. वाङ्मय सहेतुक असावे की नाही,त्यात बोध असावा की नाही यावादात मी पडत नाही;पण एवढे मात्र मी म्हणेन की,वाङ्मयाने माणसाचा ह्दयविस्तार झाला पाहिजे या विस्तारातच पुष्कळ ग्रंथी मुरतात.साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मुल्यांची जाणीव करुन देणारी असली पाहिजे.असे मी मानतो.मानवी मुल्यांचा प्रत्यया हीच वाङ्मयांचा शेवटची कसोटी मानली तर मानवी मुल्यांची किंवा गुणांची वाढ करणे हे आम्ही आमचे साध्य मानले पाहिजे."

यशवंतरावांच्या साहित्याचा विचार करता असे दिसुन येते की,त्यांच्या साहित्यात संवेदनशील व सर्जनशीलतेचा अद्भुत मिलाप आहे.शब्द शक्तीची जाणीव,व्युत्पन्नता आहे.साहित्याबद्दलचे अफाट प्रेम त्यांच्या विचारातुन दिसुन येते.साहित्य व समाज यांच्या संबंधाचे भान आणि उत्कृष्ट समीक्षक ही त्यांच्या एकंदरीत लेखनातुन आपणास दिसुन येते.एके ठिकाणी ना.सी.फडके त्यांच्या लेखनीविषयी म्हणतात की,भावनेनेओथबलेले प्रभावी भाषेंने नटलेले लेखन जी लेखणी करु शकते ती साधी सुधी लेखनीसाठी .श्रेष्ठ दर्जाला अस्सल साहित्यकाराच्या हातात शोभावी अशीच ती लेखणी आहे.....'शेवटी एक खेद म्हणुन असे सांगता येईल की राजकारणाच्य व्यग्रतेमुळे त्यांना साहित्य निर्मितीकडे पुरेसे लक्ष देता आले नाही.तरीही त्यांनी तेव्हढे काही साहित्य लिखान केले ते मेत्र एकुण मराठी साहित्यात आपले स्थानअढळ ठेवून आहे. आणि ऋणानुबंधासारख्या साहित्यकृतीचे महत्व अनन्यसाधारण अशा स्वरुपाचेच ठरते.

## संदर्भ सुची

1.यशवंतराव चव्हाण- ऋणानुबंध

2.प्रतिष्ठाण-२०१३

3.बाबासाहेब पाटील - कृष्णापुत्र



सिंधु नामदेवराव राठोड

प्राध्यापक, श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालय, जालना.